वर्ष- १२ अंक- ३६ मुंबई, मंगळवार,२१ जुलै २०२६ ते २७ जुलै २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

ह्यसेक्स, डावपेच आणि सत्तेचा खेळह्न, होमरच्या ह्यओडिसीह्नची कथा घडवण्यात महिलांची भूमिका किती महत्त्वाची?

3 → भ्रष्टाचाराच्या पुरात 'विकास' गेला वाहून?

दोन लग्न केलेल्या प्रेयसीची हत्या, चौथ्या तरुणाच्या संपर्कात ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक मध्ये थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र जागृती मोहिमेस प्रारंभ-प्रा. प्रकाश पांगम







नाशिक, महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग अंतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक येथे तुकडी क्रमांक ५- २०२६ या बॅच मध्ये महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या अभियंता यांच्या प्रशिक्षण वर्गामध्ये आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांच्या वतीने थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र याची जागृती करण्यात आली.

याप्रसंगी लेफ्ट. डॉ. संदीप बाळासाहेब भिसे यांनी प्रा. प्रकाश पांगम सरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती स्नेहलता गावडे उपसंचालक , प्रशासन, अभियंता श्री रुपेश कोडम साहेब हे उपस्थित होते. प्रा. प्रकाश पांगम सरांनी थॅलेसेमिया अनुवंशिक रक्त विषयक आजाराची माहिती करून दिली. विकसित भारतासाठी निरोगी नवीन पिढी जन्माला येणे गरजेचे आहे. त्यासाठी विवाहयोग्य वयोगटातील युवक युवतींनी लग्न करायच्या अगोदर थॅलेसिमिया टेस्ट करून घ्यावी असे सांगितले. या जागृती माध्यमातून समाजातील युवकांपर्यंत सामाजिक उपक्रमातून पोहोचणे आवश्यक आहे असे सांगितले. या प्रशिक्षणात मोठ्या संख्येने पुरुष व महिला अभियंते हजर होते. महाराष्ट्र अभियंता प्रशिक्षण प्रबोधिनीच्या मार्फत हा संदेश महाराष्ट्राच्या विविध भागात पोहोचण्याला मदत झाली आहे.

ॲनिमिया शरीरातील रक्तामध्ये हिमोग्लोबिनची कमतरता तसेच मानवी शरीरातील जंत व त्यावरील उपचार याविषयी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून वेगवेगळी उदाहरणे देऊन अभियंत्यांच्या प्रश्नांना संवाद माध्यमातून उत्तरे दिली.

श्री रुपेश कोडम साहेब अभियंता यांच्या विशेष प्रयत्नातून या प्रबोधिनीमध्ये थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र हे अभियान यशस्वीरित्या पार पडले. श्रीमती स्नेहलता गावडे तसेच उपस्थित सर्व अभियंते यांचे आश्रय ट्रस्ट ठाणे यांच्या वतीने डॉ. संदीप भिसे यांनी आभार व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रभावी संकल्पना- प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान, नाशिक महाविद्यालयात 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत 'जागतिक कौशल्य दिना' निमित्त करिअर संसदेचा शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.करिअर कट्टा' अंतर्गत करिअर संसदेचा शपथविधी सोहळा प्रसंगी प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्या डॉ. अनुराधा नांदुरकर, विभागप्रमुख डॉ. अर्चना बेंडाळे, प्रा. अर्चना कोते, करिअर कट्टा समन्वयक प्रा. तृप्ती जोशी, प्रा. पंकज देसाई, इतर शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. क. का. वाघ वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा अंतर्गत करियर संसदेची स्थापना करण्यात आलेली आहे. करियर संसदेचा शपथविधी सोहळा उद्या दिनांक १५ जुलै २०२६ रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन , सरस्वती पूजन करून , महाराष्ट्र गीताने शपथविधी सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्यांचे पालन करणे, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण, कौशल्य विकास आणि राष्ट्रहितासाठी कार्य करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ , उपप्राचार्य डॉ. ए. डी. नांदुरकर, सर्व विभागातील विभागप्रमुख, प्राध्यापक, करिअर कट्टा समन्वयक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्यांनी आपल्या मनोगतात 'करिअर कट्टा' हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम असून, स्पर्धा परीक्षा, रोजगार, उद्योजकता आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी तो उपयुक्त असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त आणि सातत्य या गुणांच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना नेतृत्व, संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य डॉ. ए. डी. नांदुरकर यांनी विद्यार्थ्यांना 'करिअर कट्टा' उपक्रमाबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कामाप्रती उत्साह व प्रामाणिकपणा दाखवण्यासाठी सांगितले. कार्यक्रमास प्राध्यापक, करिअर संसद समन्वयक, विद्यार्थी प्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तृप्ती जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पंकज देसाई यांनी मानले.

शपथविधीनंतर आगामी वर्षातील विविध उपक्रमांची रूपरेषा जाहीर करण्यात आली. कार्यक्रमासाठी के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष मा. समीरदादा वाघ, सरस्वतीनगर संकुलाचे समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर यांचे सहकार्य लाभले.

कल्याण स्थानकाबाहेर सहा महिन्यांच्या बाळाचे अपहरण; शोधासाठी चार विशेष पथके तैनात


कल्याण : कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेरील वोडाफोन गॅलरीसमोरील पुलाखालून सहा महिन्यांच्या बाळाचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी महात्मा फुले चौक (एमएफसी) पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाला वेग दिला असून, बाळाचा शोध घेण्यासाठी चार विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रोशनी सुरज साहू (वय २१, रा. सिलवासा, दादरा आणि नगर हवेली) या काही कामानिमित्त कल्याणात आल्या होत्या. सोमवारी रात्री त्या कल्याण रेल्वे स्थानकाबाहेरील पुलाखाली आपल्या सहा महिन्यांच्या बाळासह थांबल्या होत्या. रात्री त्यांना झोप लागल्यानंतर अज्ञात व्यक्तीने त्यांच्या बाळाचे अपहरण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचवेळी महिलेचा मोबाईल फोनही चोरीला गेल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच महात्मा फुले चौक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलिसांकडून रेल्वे स्थानक परिसरातील तसेच आजूबाजूच्या भागातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करण्यात येत आहे. चोरीला गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्राथमिक तपासात अपहरण करणारा आरोपी एकटा नसून त्याला इतर साथीदारांची मदत मिळाल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी महात्मा फुले चौक पोलीस, लोहमार्ग पोलीस (जीआरपी) आणि गुन्हे शाखेची संयुक्त पथके कार्यरत असून, बाळाचा शोध घेण्यासाठी चार विशेष पथके विविध दिशांनी तपास करत आहेत. दरम्यान, अपहृत बाळाबाबत किंवा संशयित व्यक्तीबाबत कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी तातडीने महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

कल्याणात प्रियकराची हत्या; मृतदेह गोणीत भरून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, महिलेचा शोध

कल्याण। कल्याणच्या मलंग रोड परिसरातील नीलकंठ सोसायटीत उघडकीस आलेल्या खूनप्रकरणाने खळबळ उडाली आहे. प्रियकराची हत्या करून त्याचा मृतदेह गोणीत भरून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप एका महिलेवर असून, मृतदेह लवकर कुजावा म्हणून बाथरूममधील नळ सुमारे २४ तास सुरू ठेवल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणातील एका व्हॉइस मेलमुळे तपासाला महत्त्वाचा धागा मिळाला असून आरोपी महिलेचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कोलकात्याकडे रवाना झाली आहेत. मानपाडा पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला असून घटनास्थळी फॉरेन्सिक तज्ज्ञांनी पाहणी केली आहे. प्राथमिक तपासात मृत व्यक्तीच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. हत्येमागील नेमके कारण, आरोपी महिलेची भूमिका आणि इतर कोणाचा सहभाग होता का, याचा तपास सुरू आहे. दरम्यान, नीलकंठ सोसायटीतील एका बंद फ्लॅटमधून गेल्या दोन-तीन दिवसांपासून तीव्र दुर्गंधी येत असल्याची माहिती रहिवाशांनी पोलिसांना दिली होती. त्यानुसार पोलिस घटनास्थळी पोहोचले असता फ्लॅट बाहेरून कुलूपबंद होता. दरवाजा उघडून आत प्रवेश केल्यानंतर बाथरूममध्ये संशयास्पद गोणी आढळली. ती उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये सडलेल्या अवस्थेतील एका पुरुषाचा मृतदेह आढळून आला. तपासादरम्यान आरोपी महिलेने पुरावे नष्ट करण्यासाठी विविध उपाय केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामध्ये मृतदेह लवकर विघटित व्हावा म्हणून बाथरूममधील पाण्याचा नळ दीर्घकाळ सुरू ठेवण्यात आल्याची बाबही तपासात समोर आली आहे. तसेच एका व्हॉइस मेलच्या आधारे पोलिसांना महत्त्वाची माहिती मिळाल्याने तपासाला वेग आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी महिला फरार असून तिचा शोध घेण्यासाठी मानपाडा पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. फॉरेन्सिक अहवाल, तांत्रिक पुरावे आणि अन्य साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

'पप्पा माझ्याबरोबर वाईट वागतात आणि दुसऱ्यांनाही वागायला लावतात' म्हणुन मुलीनं स्वतःला घेतल पेटवून

मुंबई। मन हेलावून टाकणारी एक घटना समोर आली आहे. येथे एका तरुणीने स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. या घटनेत ती गंभीररित्या भाजली असून, सध्या तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी तपास सुरू केला असता, पीडित तरुणीने आपल्याच वडिलांवर दीर्घकाळापासून लैंगिक छळ करत असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. तरुणीच्या या जबाबानंतर पोलिसांनी आरोपी पित्याला अटक करून न्यायालयात हजर केले आहे. वडील सातत्याने करायचे बलात्कार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडिलांकडून सातत्याने होणाऱ्या बलात्काराला आणि त्रासाला कंटाळूनच पीडितेने हे टोकाचे पाऊल उचलले होते. या अत्यंत संवेदनशील प्रकरणात अप्पर पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, पोलिसांनी घटनेची स्वतःहून दखल घेत (सुओ मोटो) गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर रुग्णालयात नोंदवण्यात आलेला पीडितेचा जबाब आणि तपासात हाती आलेल्या पुराव्यांच्या आधारे नराधम वडिलांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. ओडिशाच्या गंजाम जिल्ह्यातील ब्रह्मपूर परिसरातील ही घटना आहे. सोशल मीडियावरील चॅट्स या तपासादरम्यान पोलीस आणि फॉरेन्सिक टीमच्या हाती काही महत्त्वाचे तांत्रिक पुरावे लागले आहेत. बाप आणि मुलीमध्ये झालेले व्हॉट्सॲप किंवा इतर सोशल मीडियावरील चॅट्स पोलिसांना मिळाले असून, या चॅट्सना गुन्ह्यातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा पुरावा मानले जात आहे. या संभाषणांच्या आधारेच पोलीस आपला तपास पुढे नेत आहेत. याशिवाय, पीडितेने पोलिसांना सांगितले की, तिचे वडील तिच्यावर इतर पुरुषांशीही संबंध ठेवण्यासाठी दबाव आणत होते. शैक्षणिक प्रमाणपत्रे ताब्यात घेतली अन... पीडित तरुणीने जेव्हा या अत्याचाराला वाचा फोडण्याचा आणि वडिलांचा पदार्फाश करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपीने तिचे सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे स्वतःच्या ताब्यात घेतले होते, जेणेकरून ती त्याच्याविरुद्ध कोणतेही पाऊल उचलू शकणार नाही. सध्या पोलीस या सर्व आरोपांची सखोल चौकशी करत आहेत. तपासादरम्यान इतरही काही संशयितांची नावे समोर आली असून, गुन्ह्यातील त्यांच्या भूमिकेची पडताळणी केली जात आहे. यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



घर, जिथे सर्वात सुरक्षित असायला पाहिजे, तेच जर सर्वात मोठी भीती बनले तर? ओडिशाच्या ब्रह्मपूरमध्ये मुलीने पोलिसांकडे केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत. पीडितेच्या म्हणण्यानुसार, तिचे वडील बऱ्याच काळापासून तिचा लैंगिक छळ करत होते आणि इतर पुरुषांशी संबंध ठेवण्यासाठी तिच्यावर दबाव टाकत होते.

बॉलिवूडसाठी वैद्यकीय शिबिरे घेणाऱ्या बोगस डॉक्टरला 10 कोटींच्या फसवणुकीप्रकरणी अटक



मुंबई। मुंबई गुन्हे शाखेने एका अशा बोगस डॉक्टरला अटक केली आहे, ज्याने तब्बल 28 वर्षे एमबीबीएस डॉक्टर असल्याचे भासवून लोकांची फसवणूक केली. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, आरोपीने बनावट ओळख वापरून विविध बँकांमध्ये खाती उघडली होती आणि आपल्या साथीदारांच्या मदतीने गेल्या तीन वर्षांत 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' निधीच्या नावाखाली सुमारे 10 कोटी रुपयांचा अपहार केला. या टोळीचे जाळे महाराष्ट्राबाहेर इतर अनेक राज्यांत पसरल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेचे उपायुक्त राज तिलक रोशन यांनी सांगितले की, अटक करण्यात आलेला आरोपी धर्मेंद्र कुमार याने 12 वीची परीक्षाही उत्तीर्ण केलेली नाही, तरीही तो डॉक्टर असल्याचे भासवून विविध ठिकाणी वैद्यकीय शिबिरे आयोजित करत असे. त्याने बॉलिवूडमधील कामगारांसाठीही वैद्यकीय शिबिरे आयोजित केली होती, ज्यांना बॉलिवूडमधील अनेक दिग्गज अभिनेते आणि अभिनेत्रींनी हजेरी लावली होती. आपली विश्वासार्हता वाढवण्यासाठी तो या सेलिब्रिटींसोबत काढलेल्या छायाचित्रांचा वापर करायचा आणि त्यानंतर फसवणूक करायचा. धर्मेंद्र कुमार मूळचा बिहारचा रहिवासी आहे. मुंबई गुन्हे शाखेने सुमारे दोन आठवड्यांपूर्वी मोहम्मद गौस इब्राहिम खतीब (वय 52, ऊर्फ डॉ. राज खतीब) या बोगस डीसीपीसह तिघांना अटक केल्यानंतर धर्मेंद्र कुमार पोलिसांच्या रडारवर आला. या बोगस डीसीपी खतीबनेही धर्मेंद्र कुमारने आयोजित केलेल्या काही वैद्यकीय शिबिरांना भेट दिली होती. त्यामुळे बोगस डीसीपी प्रकरणातील चौकशीसाठी उपायुक्त राज तिलक रोशन यांनी शनिवारी (11 जुलै) धर्मेंद्र कुमारला आपल्या दालनात बोलावले होते. जेव्हा धर्मेंद्र कुमारने स्वतःची ओळख 'डॉक्टर' अशी दर्शवणारे व्हिजिटिंग कार्ड उपायुक्त रोशन यांना दिले, तेव्हा अधिकाऱ्यांनी त्याला त्याच्या वैद्यकीय पदवीबद्दल सविस्तर प्रश्न विचारले. चौकशीदरम्यान आरोपीची बोलताना अडखळती अवस्था झाली. तो एक भामटा असल्याचे निश्चित झाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आणि त्यानंतर त्याच्या निवासस्थानी छापा टाकला. या कारवाईदरम्यान महाराष्ट्रसह अनेक राज्यांतील व्यक्ती आणि कंपन्यांशी संबंधित कागदपत्रे, तसेच विविध प्रकल्पांचे अहवाल आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली. या कागदपत्रांच्या प्राथमिक तपासणीतून कोट्यवधी रुपयांच्या निधीची अफरातफर झाल्याचे उघड झाले आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये 'डॉ. धर्मेंद्र कुमार' या नावाने असलेले ओळखपत्र, पॅन कार्ड आणि व्हिजिटिंग कार्ड, तसेच विविध संस्थांनी दिलेली प्रमाणपत्रे आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित साहित्याचा समावेश आहे.

'सेक्स, डावपेच आणि सत्तेचा खेळ', होमरच्या 'ओडिसी'ची कथा घडवण्यात महिलांची भूमिका किती महत्त्वाची?



प्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलान यांचा ' द ओडिसी' हा चित्रपट रिलीज होत आहे. होमर नावाच्या महाकवीने लिहिलेल्या ओडिसी या महाकाव्यावर हा चित्रपट आधारित आहे.

साधारण 2800 वर्षांपूर्वी लिहिलेल्या महाकाव्यावर आता चित्रपट बनत आहे. परंतु, ही केवळ एका शूर योद्ध्याची कथा नाही.

या कथेचा नायक ओडिसियस असला, तरी त्याच्या प्रवासात भेटणाऱ्या महिला, अप्सरा, जादूगार स्त्रिया आणि देवता यांच्या युक्त्या, डावपेच आणि मोहपाशामुळेच ही कथा पुढे सरकते. त्यामुळे ओडिसियस हा केवळ पराक्रमी नायक न वाटता, तो एक सामान्य माणसासारखाच वाटू लागतो.

'द ओडिसी' हे प्राचीन महाकाव्य ट्रोजन युद्धानंतर आपल्या इथाका या राज्यात परतण्याचा प्रयत्न करणाऱ्या ग्रीक योद्धा ओडिसियसची कथा सांगते.

सुमारे 10 वर्षे चाललेल्या या प्रवासात त्याला अनेक संकटांचा आणि धोक्यांचा सामना करावा लागतो. ही कथा दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलान यांनी आता चित्रपटाच्या रूपात साकारली असून, त्यात मॅट डेमनसह अनेक दिग्गज कलाकार भूमिका साकारत आहेत.

याचा मुख्य नायक पुरुष असला, तरी द ओडिसीच्या कथेत महिलांचे वर्चस्व दिसून येते. आपल्या राज्यात परतण्याच्या ओडिसियसच्या प्रवासात त्याला भेटणाऱ्या महिला, अप्सरा आणि देवता यांच्या युक्त्या, आकर्षण आणि निर्णयांमुळे प्रत्येक टप्प्यावर कथेची दिशा बदलत जाते.

त्यामुळे ओडिसी ही केवळ शौयार्ची कथा नाही, तर कामवासना, डावपेच आणि सत्तेसाठीचा संघर्ष अशी कथा आहे, जी आजही तितकीच प्रभावी आणि समर्पक वाटते.

ओडिसी हे महाकाव्य सुरुवातीपासून नाही, तर थेट मध्यातून सुरू होते. ओडिसियस 7 वर्षांपासून कॅलिप्सो अप्सरेसोबत ओगिजिया बेटावर अडकलेला असतो आणि समुद्रकिनारी बसून आपल्या राज्यात परतण्याची आस धरत रडत असतो.

ट्रोजन युद्धात पराक्रम गाजवणारा हा योद्धा इथे मात्र पूर्णपणे असहाय वाटतो. इतकंच नव्हे, तर त्याची त्या बेटावरून मुक्तता करण्यासाठी देवतांनाही एकत्र येऊन निर्णय घ्यावा लागतो.

या महाकाव्याच्या सुरुवातीलाच ओडिसियस आणि कॅलिप्सो अप्सरा गेल्या 7 वर्षांपासून एकत्र राहत असतात.

परंतु, ओडिसियस केवळ कॅलिप्सोमुळेच अडकलेला नसतो, तर तो स्वतःच्या मनाशीही संघर्ष करत असतो. आजच्या काळात पाहिलं, तर ट्रोजन युद्धातील अनुभवांमुळे त्याला मानसिक धक्का (पीटीएसडी) बसला असावा, असं आजच्या वाचकालाही वाटू शकतं.

त्यामुळे त्याला घरी परतण्याचा निर्णय घेणं कठीण जातं. तरीही कॅलिप्सोचा त्याच्यावर असलेला प्रभावही तितकाच मोठा असतो.

ओडिसियस स्वतः कॅलिप्सोला सांगतो की, त्याची पत्नी पेनेलोप सुंदर असली तरी ती एक सामान्य मानवी स्त्री आहे, त्यामुळे तिच्या सौंदर्याची तुलना कॅलिप्सोशी होऊ शकत नाही.

ओडिसियसच्या दीर्घ अनुपस्थितीतही त्याची पत्नी पेनेलोप मात्र निष्क्रिय राहिली नाही. तिच्याशी लग्न करून इथाकाचा राजा बनण्याची इच्छा (सुटर्स) असलेले 108 जण राजवाड्यात येतात. परंतु, पेनेलोप आपल्या शौयार्ने आणि चातुयार्ने त्यांना टाळत राहते.

ती आपले सासरे लेअर्टिस यांच्यासाठी दिवसा अंत्यसंस्काराचे वस्त्र विणते, पण रात्री तेच वस्त्र पुन्हा उसवून टाकते. त्यामुळे तिचं काम कधीच पूर्ण होत नाही आणि लग्नाचा निर्णयही पुढे ढकलला जातो.

या महाकाव्यातील हा सर्वात संस्मरणीय प्रसंग मानला जातो. पेनेलोपने या इच्छुकांना किती काळ रोखून धरलं, यावरच ओडिसियसला पुन्हा आपल्या राज्याचा राजा होता येईल की नाही, हे अवलंबून असतं.

सायरेन्सच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गाण्यांमध्ये पुरुषांना आकर्षित करून मृत्यूच्या दिशेने नेण्याची ताकद असते.

ओडिसियसला मदत करणाऱ्या देवतांमध्ये सर्वात महत्त्वाची देवता म्हणजे



अथेना. ट्रोजन युद्धातही तिने त्याला मदत केली होती आणि त्याला सुरक्षितपणे इथाकाला परत आणण्यासाठी पुढाकारही घेतला.

नंतर ओडिसियस फेशियन्स लोकांच्या भूमीवर अत्यंत असहाय्य आणि अशक्त अवस्थेत पोहोचतो. तेव्हा अथेना आपल्या युक्तीने त्याची सुटका घडवून आणते. ती त्याचा कमकुवतपणा लपवते आणि त्याचं रूप अधिक तेजस्वी, आकर्षक व प्रभावी दिसेल असं करते.

त्यामुळे सागरीप्रवास करणाऱ्या फेशियन्सचे मन जिंकण्यास मदत होते. फेशियन्स लोक त्याचं आदरातिथ्य करतात, त्याला आश्रय आणि संपत्ती देतात, तसेच सुरक्षितपणे इथाकाला परत जाण्याची व्यवस्थाही करतात.

'सेक्स, डावपेच आणि सत्तेचा खेळ', होमरच्या 'ओडिसी'ची कथा घडवण्यात महिलांची भूमिका किती महत्त्वाची?फोटो स्त्रोत,अछअट

सर्वात महत्त्वाचं म्हणजे, अथेना जेव्हा जेव्हा ओडिसियस आणि त्याचा मुलगा टेलेमॅकस यांच्यासमोर येते, तेव्हा ती अनेकदा पुरुषाच्या रूपात येते. कधी ती इथाकाचा मित्र असलेल्या मेंटसच्या रूपात दिसते, तर कधी फेशियन्स लोकांच्या पुरुष दूताचं रूप घेते.

अथेनाला हे चांगलंच माहीत असतं की, पृथ्वीवर सत्ता पुरुषांच्या जरी हातात असली, तरी घटनांना कलाटणी किंवा वळण देण्याचं काम महिला आपल्या चातुयार्ने, युक्तीने आणि डावपेचांनी करतात.

ओडिसियसला प्रवासात भेटलेल्या पात्रांकडे पाहिलं, तरी हे स्पष्ट होतं. फेशियन्स लोकांच्या प्रदेशात पोहोचल्यानंतर तो आपल्या प्रवासातील अनुभव कथन करतो. कमळ खाणाऱ्या लोकांपासून (लोटस इटर्स) ते एकाक्ष राक्षसांपर्यंत (सायक्लॉप्स) अनेक विलक्षण भेटींची तो कहाणी सांगतो.

या प्रवासात त्याला भेटलेल्या पौराणिक महिला पात्रांच्या कथा मात्र अधिक अस्वस्थ करणाऱ्या आणि थरारक वाटतात. कारण त्या वरकरणी निरुपद्रवी आणि शांत दिसतात.

निरागस चेहऱ्यामागचं रहस्य

ओडिसियसचं जे लोक स्वागत करतात त्यांना तो सहजपणे सांगतो की, पश्चिमेकडील समुद्रातील एका धोकादायक आणि निर्जन खडकाळ बेटावर राहणाऱ्या सायरेन्सचं (ललना) गाणं ऐकण्यासाठी तो खूप उत्सुक होता.

पुढच्या काळातील ग्रीक कथा आणि कलांमध्ये सायरेन्सना पक्ष्यासारख्या स्त्रिया किंवा जलपरींच्या (मर्मेड) रूपात दाखवलं गेलं. परंतु, ओडिसियस त्यांच्या रूपापेक्षा त्यांच्या सुमधुर गाण्याचं वर्णन करतो. कारण त्या गाण्यात पुरुषांवर भुरळ पाडून मृत्यूच्या दिशेने खेचून नेण्याची ताकद असते.

सायरेन्सच्या समोरच्या माळरानावर भूतकाळात त्यांच्या गाण्याच्या मोहात पडून प्राण गमावलेल्या अनेक पुरुषांची हाडं विखुरलेली असतात. तरीही ओडिसियस हे गाणं ऐकण्याचा धोका पत्करतो.

तो आपल्या सहकाऱ्यांना स्वतःला



जहाजाच्या खांबाला घट्ट बांधून ठेवायला सांगतो, जेणेकरून गाण्याच्या मोहात पडून तो उडी मारू शकणार नाही. सायरेन्सचा आवाज जितका मधुर असतो, तितकाच तो जीवघेणा असतो.

होमरच्या कवितेत धोकादायक जादूगार स्त्री सर्सी सुरुवातीला आपली जादुई शक्ती लपवून ठेवते.

सर्सी हीदेखील एक सुंदर, पण धोकादायक स्त्री होती. तिला पहिल्यांदा पाहिल्यावर ती निरुपद्रवी वाटायची. पण सायरेन्सप्रमाणेच तिच्या मोहक रूपामागे जादुई शक्ती लपलेल्या होत्या.

महाकवी होमरने तिला एक जादूगार स्त्री म्हणून दाखवलं आहे. औषधी वनस्पती आणि जादुई पेयांच्या साहाय्याने ती ओडिसियसच्या सहकाऱ्यांचं रूपांतर डुकरांमध्ये करू शकत होती.

ओडिसियसला प्रवासात भेटलेल्या इतर अनेक गूढ पात्रांप्रमाणे सर्सी ही केवळ अडचणी निर्माण करत नाही, तर त्याला मदतही करते. ती ओडिसियसची प्रेयसी बनते आणि त्याला पाताळलोकात म्हणजेच मृत्यूलोकात (अंडरवर्ल्ड) जाण्याचा मार्गही दाखवते.

तिथे ओडिसियसची भेट टायरेसियस या भविष्यवेत्ताशी होते. इथाकाला सुरक्षितपणे परतण्यासाठी टायरेसियस त्याला महत्त्वाचा सल्ला देतो.



या कथेचा महत्त्वाचा संदेश असा आहे की, राक्षसी स्त्रिया किंवा मोहक अप्सरांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांच्याशी समजूतदारपणे वागणं गरजेचं असतं. ओडिसियसला काही वेळा एका विशिष्ट मयार्देपर्यंत त्यांच्या प्रभावाचा स्वीकार करावा लागतो, पण त्यात पूर्णपणे वाहून जाता कामा नये.

प्रवासात भेटणारी प्रत्येक व्यक्ती किंवा पात्र त्याच्या संयमाची, निर्णयक्षमतेची आणि मयार्दा पाळण्याच्या त्याच्या क्षमतेची परीक्षा घेतात. प्राचीन ग्रीक संस्कृतीत या संयमाला आणि संतुलित वागण्याला जास्त महत्त्व दिलं जात होतं.

इतरांच्या मोहात पडण्याची आणि भावनांनी प्रभावित होण्याची प्रवृत्तीच ओडिसियसला खऱ्या अथार्ने मानवी नायक बनवते.

फोटो स्त्रोत,ऋऋळळ क्टअऋऋर

फोटो कॅप्शन,इतरांच्या मोहात पडण्याची आणि भावनांनी प्रभावित होण्याची प्रवृत्तीच ओडिसियसला खऱ्या अथार्ने मानवी नायक बनवते.

काही वाचकांना ओडिसियसने सांगितलेल्या साहसकथा काल्पनिक वाटतात. फेशियन्स लोकांनी आपल्याला मायदेशी म्हणजेच इथाकाला पोहोचवावं, यासाठी त्याने या गोष्टी रंगवून सांगितल्या असाव्यात, असंही त्यांना वाटतं.

अशा दृष्टिकोनातून पाहिलं, तर कदाचित ओडिसियसचा खरा संघर्ष राक्षसांशी नव्हता, तर त्याच्या स्वतःच्या मनातील दुगुर्णांशी किंवा विकारांशी होता. हे अंतर्गत संघर्ष बाहेरच्या संकटांपेक्षा अधिक घातक आणि कठीण ठरतात.

ओडिसियसच्या कथा इतक्या रंगतदार, कल्पनारम्य आणि थरारक आहेत की, त्या कितपत खऱ्या आहेत, असा प्रश्न वाचकांना पडतो. पण हाच या महाकाव्याचा मोठा आकर्षणबिंदूही आहे.

यामुळेच ओडिसियस इतर नायकांपेक्षा वेगळा ठरतो. लेखिका एमिली विल्सन यांनी ओडिसीचे भाषांतर केले आहे. एमिली यांनी त्याचं वर्णन एक 'गुंतागुंतीचा माणूस' असं केलं आहे. त्यात त्यांनी तो परिस्थितीनुसार आपली ओळख आणि कथा बदलतो. फसवणूक करण्यात तो तरबेज असल्यामुळे त्याचं व्यक्तिमत्त्व अधिक गुंतागुंतीचं वाटतं.

ओडिसियस बुद्धिमान, कल्पक आणि काही उणिवा असलेला नायक आहे. त्यामुळेच तो प्राचीन ग्रीक कथांमधील सर्वात मानवी वाटणारा नायक ठरतो. महिलांचं आकर्षण आणि फेशियन्स लोकांसारख्या वैभवशाली जगांचा मोह हीच त्याची ताकदही ठरते आणि अनेक संकटांचं कारणही बनते.

त्यामुळेच ओडिसियसची कथा आजच्या वाचकांनाही आपलीशी वाटते.



पावसाळ्यातील या चुकांमुळे पोहचाल थेट हॉस्पिटलात

पावसाळ्यात हवेत ओलावा असल्याने हवामान रोगट असते. असे हवामान विषाणूंच्या वाढीसाठी पोषक असते.परिणामी या दिवसात संसर्ग वाढतो. म्हणूनच या दिवसात तब्येतीची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. पावसाळ्यातला साधा सर्दी खोकलाही तुम्हाला न्यूमोनियापर्यंत पोहचवू शकतो. यामुळे यादिवसात होणाऱ्या संसगार्ला हलक्यात घेऊ नये.

- **ताप :** पावसाळ्यात सर्दी खोकला ताप येण ही सामान्य गोष्ट आहे. यामुळे वरील त्रास होताच आपण घरातील तापावरची गोळी घेतो. पण जर गोळी घेतल्यानंतर ४८ तास उलटूनही ताप उतरला नाही, खोकला येत राहीला आणि श्वास घेण्यास त्रास होत असेल , अंगावर लाल चट्टे, आले असतील नाकातून रक्त येत असेल तर तात्काळ हॉस्पिटल गाठावे. कारण डेंग्यू, चिकनगुनिया,मलेरिया, लेप्टोपायरोसिस यासारख्या आजारांची सुरुवात तापानेच होते. यामुळे प्रत्येकवेळी येणारा ताप हा व्हायरलच असेल असे नाही.
- **पावसाचे पाणी :** पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर पाणी साचते. अशावेळी आपण या साचलेल्या, तुंबलेल्या पाण्यातून सहज चालत जातो. पण या पाण्यामुळे फक्त तुमची चप्पल किंवा बूटच खराब होत नाहीत तर तुमची तब्येतही खराब होऊ शकते. त्यातही जर तुमच्या पायाला जखम असेल, कापले असेल तर या पाण्यातील बॅक्टेरिया जखमेतून तुमच्या शरीरात सहज प्रवेश करतात. यामुळे स्किन इन्फेक्शनच नाही तर लेप्टोपायरोसिस सारखा गंभीर आजारही होऊ शकतो. ज्यामुळे लिव्हर, किडनी आणि फुफ्फुस निकामी होऊ शकतात. यामुळे पावसाळ्यात घराबाहेर पडताना काळजी घ्यावी. जर पायाला जखम असेल तर ती विशेष काळजी घ्यावी . बाहेरून घरी आल्यावर पाय साबणाने स्वच्छ धुवावेत.
- **डास :** पावसाळ्यात घराघरात माशा आणि इतर किटकांबरोबरच डासांचा उपद्रवही वाढतो. पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचते. शिवाय हवेत आद्रता असल्याने वातावरण दमट असते. हे वातावरण डासासारख्या किटकांच्या पोषणास उपयुक्त असते. यामुळे यादिवसात किटकांची पैदास वाढते. मादी डास घरातील फ्लॉवर पॉट, एसी ड्रीप ट्रे, फ्रीजजवळ , कूलर, कुंड्याच्या खाली अंडी घालते. त्यातून डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढतो. यामुळे यादिवसात घराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे.
- **ओले कपडे :** पावसाळ्यात घरात कपडे सुकवले जातात. पण त्यामुळे घरात दमटपणा वाढतो. त्यामुळे अस्थमा, एलर्जी, सायनोसायटिस सारख्या समस्या उद्भवतात. पण जर यादिवसात कपडे सुकवण्यासाठी दुसरा पर्यायच नसेल तर घर बाहेरील हवा येईल हे पाहावे, कपडे वाळत घातलेल्या रुममध्ये फॅन सुरू ठेवावा. त्यामुळे दमटपणा कमी होतो. डिह्युमिडिफायर ठेवावे.
- **अँटीबायोटीक :** पावसाळ्यात सर्दी, खोकला, ताप असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही औषध गोळ्या घेऊ नयेत. कारण ही औषध डेंग्यू, चिकनगुणिया, इन्फ्लूएंजा किंवा इतर संसर्गात काम करत नाहीत. अशावेळी ताप उतरत नाहीये किंवा फरक पडत नाहीये म्हणून तुम्ही घरातील अँटीबायोटीक खात राहाल तर शरीर अँटीबायोटीकला प्रतिसाद देणेच कमी करते. त्यामुळे उपचारास उशीर होऊ शकतो.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२१ जुलै २०२६ ते २७ जुलै २०२६

संपादकीय

भ्रष्टाचाराच्या पुरात 'विकास' गेला वाहून?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



जुलै महिना उजाडला, पण यंदा पावसाने वेळेवर हजेरी लावली नाही. शेतकरी, नागरिक, उद्योग, व्यापारी, प्रशासन अशा प्रत्येकाचे डोळे आकाशाकडे लागले होते. धरणांतील पाणीसाठे तळाला गेले होते. राज्यातील अनेक शहरांमध्ये पाणी कपात सुरू झाली होती. ह्यꣳआता पुढे कायꣳ हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात होता. पण जुलैच्या पहिल्याच आठवड्यात अवघ्या चार-पाच दिवसांच्या पावसाने महाराष्ट्रात वेगळेच चित्र उभे केले. दुष्काळाची भीती संपली खरी, पण त्याचवेळी सरकारच्या तथाकथित विकास मॉडेलचा बुरखा फाटला. पहिल्याच पावसात रस्त्यांवर पाण्यापेक्षा भ्रष्टाचार आणि कमिशनच्या नद्या वाहताना दिसल्या. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा उभारल्याचे दावे करण्यात आले. ह्यस्मार्ट सिटीꣳ, ह्याइन्फ्रा रेव्होल्युशनꣳ, ह्याइंजिनिअरिंग मार्वलꣳ, ह्याडबल इंजिनचा विकासꣳ अशा घोषणांचा अक्षरशः मारा झाला. उद्घाटनांचे सोहळे, हेलिकॉप्टरमधून पाहणी, ड्रोन शूट, वृत्तपत्रांची पानेची पाने भरणाऱ्या जाहिराती, रील्स आणि सोशल मीडियावरील प्रचार यामुळे महाराष्ट्रात विकासाचा सुवर्णकाळ सुरू असल्याचे चित्र रंगवले गेले. पण चार दिवसांच्या पावसाने या दाव्यांचा फुगा एका क्षणात फोडला. मुंबईसह महामुंबई जलमय झाली. लोकल रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने ठप्प झाली. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे, मुंबई-गोवा हायवे या महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. सरकारी खासगी कार्यालयांना सुट्टया जाहीर कराव्या लागल्या. शाळा बंद ठेवाव्या लागल्या. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि महामुंबईतील अनेक भाग अंधारात बुडाले. हजारो नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठीही संघर्ष करावा लागला. ही नैसर्गिक आपत्ती नव्हती; हा व्यवस्थेच्या अपयशाचा सार्वजनिक पंचनामा होता. मिसिंग लिंक नव्हे, भ्रष्टाचाराची लिंक १ मे २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवरील मिसिंग लिंक प्रकल्पाचे उद्घाटन करताना त्याला इंजिनिअरिंगचा चमत्कार, जगातील सर्वात रुंद बोगदा आणि विकासाचा नवा अध्याय अशी विशेषणे दिली होती. प्रचार इतका करण्यात आला की जणू महाराष्ट्राने अभियांत्रिकीचा जागतिक विक्रम केला आहे. पण अवघ्या नव्वद दिवसांत पहिल्याच पावसात या अभियांत्रिकी चमत्काराचे पितळ उघडे पडले. दरड कोसळल्याने बोगद्याची कमान कोसळली. शेकडो टन दगड, माती, चिखल रस्त्यावर आला. वाहतूक बंद झाली, हजारो वाहने अडकली. कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले. राज्य सरकारने पुन्हा एकदा ॲक्ट ऑफ गॉडचा आधार घेत जबाबदारी निसर्गावर ढकलण्याचा प्रयत्न केला. या प्रकल्पाच्या उद्घाटनानंतर रस्त्यावर खड्डे पडले, त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्यपहिला पाऊस म्हणजे टेस्टꣳ असे स्पष्टीकरण दिले होते. जनतेच्या कष्टाचे हजारो कोटी रुपये खर्चून उभारलेले महामार्ग आणि बोगदे हे प्रयोगशाळेतील नमुने आहेत का? त्यांच्या ह्याटेस्टिंगꣳसाठी नागरिकांच्या जीवाची आणि सुरक्षिततेची किंमत मोजावी लागणार असेल, तर अशा विकास मॉडेलचा अर्थ तरी काय? असा प्रश्न जनता विचारत आहे. वादग्रस्त कंपनीवर सरकारची मेहेरनजर? या प्रकल्पाचे काम करणाऱ्या नवयुग इंजिनिअरिंग कंपनीचा इतिहास तपासला तर अनेक गंभीर प्रश्न उभे राहतात. उत्तराखंडमधील सिलक्यारा बोगदा दुर्घटना, समृद्धी महामार्गावरील गर्डर दुर्घटना, विविध प्रकल्पांतील अपघात, सुरक्षा नियमांचे उल्लंघन, अशी वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या कंपनीला महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प देण्यात आला. सरकारने ही कंपनी निवडताना तिच्या पूर्व इतिहासाची तपासणी केली होती का? जर केली असेल तर इतक्या वादग्रस्त कंपनीला हजारो कोटी रुपयांचे कंत्राट का दिले? आणि जर तपासणी केली नसेल, तर हा निष्काळजीपणा नव्हे का? जनतेच्या मनात निर्माण होणाऱ्या ह्यकमिशनꣳच्या संशयाला सरकारकडे आजही समाधानकारक उत्तर नाही. स्मार्ट सिटीचा बोजवारा, आमदारही घराबाहेर पडू शकले नाहीत पिंपरी-चिंचवडमधील रावेत, महामुंबईच्या नालासोपारा-विरार परिसरात तब्बल ४८ तास वीजपुरवठा खंडित राहिला. नागरिकांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला. पिण्याचे पाणी बंद झाले. मोबाईल नेटवर्क, इंटरनेट, लिफ्ट, रुग्णालयातील उपकरणे सर्वकाही ठप्प झाले. वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित या पूरस्थितीमुळे चार दिवस विधिमंडळाच्या अधिवेशनाला पोहोचू शकल्या नाहीत. यावरून स्थिती किती बिकट असेल याचा अंदाज येतो. स्मार्ट सिटीचा दावा करणाऱ्या शहरात दोन दिवस नागरिक अंधारात राहत असतील, तर स्मार्ट नेमके काय आहे? केवळ एलईडी दिवे आणि रंगीत फलक लावणे म्हणजे स्मार्ट सिटी होत नाही. आपत्तीच्या काळात सेवा अखंड ठेवणे हीच खरी स्मार्ट व्यवस्था असते. झाडांसोबत कोसळलेले विकासाचे दावे मुंबईत आणि परिसरातील सहाशेहून अधिक झाडे कोसळली. शेकडो वाहनांचे नुकसान झाले. झाडे पडून, उघड्या मॅनहोलमध्ये पडून अनेक नागरिकांचा मृत्यू झाला. प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्व तयारीचे दावे केले जातात. गाळ काढण्यावर शेकडो, हजारो-कोटी रुपये खर्च केले जातात, मग ही तयारी नेमकी कुठे गेली? प्रत्येक वर्षी तोच प्रश्न, तीच उत्तरे आणि तीच पुनरावृत्ती. जाहिरातींचा विकास की जनतेचा? आज महाराष्ट्रात विकासापेक्षा विकासाच्या जाहिरातींवर अधिक खर्च होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. उद्घाटनाचा सोहळा भव्य असतो, पण देखभाल शून्य. सोशल मीडियावरील रील्स व्हिडीओ आकर्षक असतात, पण प्रत्यक्षात रस्ते वाहून जातात. नागरिक पाण्यात, चिखलात अडकतात. पुण्यापासून मुंबईपर्यंत मेट्रो स्टेशनला गळती लागते. एवढेच काय, पंतप्रधानांनी उद्घाटन केलेला नवी मुंबई विमानतळ पावसात गळतो. सरकारच्या या गलथानपणावर लोकांनी प्रश्न उपस्थित केले की, टीका करणाऱ्यांना ह्यसोडणार नाहीꣳ अशा धमक्या मुख्यमंत्री देत आहेत. ज्यांना कुत्रं विचारत नाही ते मुख्यमंत्र्यांवर टीका करतात, असेही ते म्हणाले. भ्रष्टाचारावर, गलथानपणावर टीका म्हणजे महाराष्ट्रावर टीका होत नाही. मुख्यमंत्री म्हणजे महाराष्ट्र नाही, याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे. त्यांच्या लोकांनी १५ पैसे ट्वीटवाली जी विषवल्ली वाढवली होती तिचा त्रास होऊ लागल्यावर आता मुख्यमंत्री सोशल मीडियावर सरकारच्या चुका दाखवून देणाऱ्या युवकांना भाड्याचे तट्टू म्हणत आहेत. लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांना धमकावणे ही सत्ताधाऱ्यांची अस्वस्थता दाखवते. मुख्यमंत्री टीकेवरून एवढे अस्वस्थ का होत आहेत? विकासाची खरी परीक्षा उद्घाटनात नाही, पावसात असते कोणताही पूल, बोगदा किंवा महामार्ग उद्घाटनाच्या दिवशी यशस्वी ठरत नाही. त्याची खरी परीक्षा पहिल्या पावसात, पहिल्या पुरात आणि पहिल्या संकटात होते. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प या परीक्षेत नापास झाले आहेत. जनतेने सरकारकडून चमत्कारांची अपेक्षा केलेली नाही; पण सुरक्षित, दर्जेदार आणि टिकाऊ सुविधा नक्कीच अपेक्षित आहेत. हजारो कोटी रुपये खर्च करूनही जर नागरिकांचे जीव धोक्यात येत असतील, तर तो सार्वजनिक पैशांचा अपव्यय आहे. आज प्रश्न केवळ एका बोगद्याचा किंवा एका रस्त्याचा नाही. प्रश्न संपूर्ण विकास मॉडेलचा आहे. जर विकासाच्या नावाखाली निकृष्ट दर्जाची कामे, कंत्राटदारांचे हित, कमिशनची संस्कृती आणि जाहिरातींची आतषबाजी यालाच प्राधान्य असेल, तर प्रत्येक मान्सून हा भ्रष्टाचाराची चार्जशीट घेऊनच येणार. कोणताही पूल, बोगदा किंवा महामार्ग उद्घाटनाच्या दिवशी यशस्वी ठरत नाही. त्याची खरी परीक्षा पहिल्या पावसात, पहिल्या पुरात आणि पहिल्या संकटात होते. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प या परीक्षेत नापास झाले आहेत.

केवळ सूचनेने कर्तव्य संपेल का?



सध्या महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनामध्ये महिलांना शेतकरी म्हणून दर्जा देणारे विधेयक संमत होणे, अमली पदार्थांच्या तस्करीचे वाढते प्रमाण, वाढती गुन्हेगारी अशा काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली; परंतु एक असा विषय चचेर्ला आला, ज्याचा अधिक गाजावाजा झाला नाही; परंतु हा विषय युवा पिढीच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. येत्या काळात याविषयीचे धोरण निश्चित करावेच लागेल. विषय आहे ह्यएनर्जी ड्रिंकꣳच्या (उत्तेजक पेयाच्या) नावाखाली बाजारात विकल्या जाणाऱ्या हानीकारक पेयांचा. विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या अंतर्गत भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला. त्यावर अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरि झिरवाळ यांनी शाळेपासून ५०० मीटरच्या आत ह्यएनर्जी ड्रिंकꣳ आढळल्यास कारवाई केली जाईलꣳ, असे उत्तर दिले; परंतु हे ह्यड्रिंकꣳ विद्यार्थ्यांसाठी हानीकारक असेल, तर केवळ शाळेच्या परिसरात त्यावर बंदी घालून चालणार नाही. त्यावर काही धोरणात्मक आणि ठोस उपाययोजना निश्चित करावी लागेल. प्रश्न उपस्थित करतांना आमदार विक्रम पाचपुते यांनी ह्यस्टिंगꣳ नावाच्या पेयाच्या बाटल्या सभागृहात दाखवल्या; परंतु अशी कितीतरी पेय ह्यएनर्जी ड्रिंकꣳ म्हणून बाजारात विकली जात आहेत. त्यामध्ये बाजारात सध्या ह्यरेड बुलꣳ, ह्यमॉनस्टर एनर्जीꣳ, ह्यस्टिंगꣳ, ह्यहेल एनर्जीꣳ अशी कितीतरी ह्यएनर्जी ड्रिंकꣳचा समावेश आहे. या ह्यएनर्जी ड्रिंकꣳमधील ह्यकॅफिनꣳ हा उत्तेजक पदार्थ, साखरेचे अतीप्रमाण, पेयात असलेले रासायनिक रंग आदी घटक केवळ मुलांसाठी नव्हेत, तर मोठ्या व्यक्तींसाठीही हानीकारक आहेत; परंतु हे सर्व घटक ह्यअन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाꣳ (एफ. एस.एस.आय.) नुसार नियमात बसत असल्यामुळे या कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳवर कारवाई करता येत नाही. आमदार पाचपुते यांनी सभागृहात दाखवलेले ह्यस्टिंगꣳ या पेयाच्या बाटलीवर ह्यलहान मुले, गरोदर किंवा स्तनदा स्त्रिया यांच्यासाठी कॅफिन हा घटक पेय नाहीꣳ, असे नमूद करण्यात आले आहे. साधारणतः दिवसाला ५०० मिलीलिटरहून अधिक ह्यकॅफिनꣳ शरिरात जाणे आरोग्याला हानीकारक मानले जाते. ह्यस्टिंगꣳच्या २५० मिलीलिटरच्या बाटलीमध्ये ७२ मिलीग्रॅम कॅफिन असते. अशा प्रकारे विविध कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳमध्ये उणे-अधिक प्रमाणात कॅफिनचे प्रमाण असते. अनेकदा मुले एकाहून अधिक ही पेये पितात आणि ती पिण्यामध्ये नियमितता असते. अशा पेयांतील ह्यकॅफिनꣳमुळे तात्पुरती तरतरी वाटते; परंतु त्यांच्या अतीसेवनामुळे अनेक गंभीर व्याधी निर्माण होतात. ह्यजागतिक आरोग्य संघटनेꣳनेही याविषयी चिंता व्यक्त केली आहे.

अशा प्रकारची पेये सध्या शहरांपासून ग्रामीण भागांपर्यंत गल्लीबोळात विक्रीसाठी ठेवली जात आहेत. हृदयाचे ठोके अचानक वाढणे, रक्तदाब वाढणे, हृदयविकाराचा झटका येणे, हा दुष्परिणाम ह्यएनर्जी ड्रिंकꣳच्या अतीसेवनानेही होऊ शकतो. लहान मुलांच्या मज्जासंस्थेवरही याचा विपरीत परिणाम होतो. हे दुष्परिणाम दिसत असले, तरी या सर्व कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳचा समावेश ह्यकॅफिनꣳयुक्त पेयांमध्ये होतो. पेयामध्ये ह्यकॅफिनꣳचे प्रमाण ह्याअन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाꣳने निश्चित केले आहे. त्यामुळे या नियमाच्या अधीन राहूनच ही पेये बनवण्यात येत आहेत. त्यामुळे त्यांची विक्री ही अवैध नाही आणि त्यांच्यावर थेट बंदीही घालता येत नाही. हृदयविकाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता यामागील विविध कारणांपैकी ह्यएनर्जी ड्रिंकꣳ हेही एक कारण आहे. यातील मोठा धोका हा आहे की, कॅफीन मद्यामध्येही असते. उलट मद्यामध्ये कॅफिनचे प्रमाण कथित एनर्जी ड्रिंकपेक्षा अधिक असते; परंतु यातील धोका हा आहे की, मद्याचे दुष्परिणाम लक्षात घेऊन पालक मुलांना मद्यापासून दूर ठेवण्याचा तरी प्रयत्न करतात; परंतु हे कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳ मद्याच्या प्रकारात येत नसल्यामुळे त्याविषयी समाजात तेवढी जागरूकता नाही. त्यामुळे मुले, युवक हे कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳ पित असूनही त्याच्या धोक्यापासून समाजात तितकीशी जागृती झालेली नाही.

ह्यलहान मुले आणि गरोदर स्त्रिया यांच्यासाठी हे पेय नाहीꣳ, एवढी सूचना लिहून ही पेय निर्माण करणारी आस्थापने समाजाप्रतीचे कर्तव्य निभावल्याच्या आविभार्वात असतात; परंतु हे पेय विकत घेणारी मुले किंवा गरोदर स्त्रिया आहेत, हे कुणीच पहात नाही. हे कर्तव्य अन्न आणि औषध प्रशासनाचे अर्थात सरकारचे आहे. सद्यःस्थितीत शाळेतील आणि महाविद्यालयीन विद्यार्थी अशा प्रकारची कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳ मोठ्या प्रमाणात विकत घेत आहेत. आस्थापनांनी या पेयांवर धोक्याची सूचना लिहिली असली, तरी त्यानुसार मुले किंवा गरोदर स्त्रिया यांना या कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳची विक्री केली जात नाही, याची पडताळणी करण्याचे अन जर विक्री होत असेल, तर कारवाई करण्याचे दायित्व अन्न आणि औषध प्रशासन यांचे आहे. केवळ शाळांच्या बाजूला अशा उत्पादनांवर बंदी घालून चालणार नाही, तर भरारी पथके नियुक्त करून ही पेये मुले आणि गरोदर महिला यांना विकली जात नाहीत ना, याची पडताळणी प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. संबंधित आस्थापनांनी केवळ प्रतिबंधात्मक सूचना लिहिल्याने सरकारचे कर्तव्य संपत नाही.

येत्या काळात मद्याप्रमाणे या कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳविषयी सरकारला धोरण निश्चित करावे लागेल. काही वलयांकित व्यक्ती वा अभिनेते किंवा अभिनेत्री अशा उत्पादनांची विज्ञापने करतात. त्यामुळे युवा वर्ग याकडे आकर्षित होतो. त्यामुळे अशा कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳवर प्रतिबंध घालणारे धोरण केंद्र सरकारने निश्चित करणे आवश्यक आहे. यापेक्षाही ह्यआत्मनिर्भर भारतꣳ योजनेच्या अंतर्गत स्वदेशी पेयांच्या जागृतीवर सरकारने अधिक भर देणे आवश्यक आहे. कोकम, आवळा, लिंबू यांपासून अशी अनेक भारतीय पेये निर्माण करता येऊ शकतात की, जी आरोग्यासाठी अपायकारक नव्हेत, तर हितकारक आहेत; परंतु अशा उत्पादनांचे महत्त्व समाजापर्यंत पोचवणे आवश्यक आहे. भारतीय पेयांची निर्मिती करण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन दिल्यास त्यातून एक मोठी अर्थव्यवस्था निर्माण होऊ शकेल. त्यामुळे कथित ह्यएनर्जी ड्रिंकꣳविषयीचे धोरण निश्चित करणे, त्याविषयी जनजागृती करणे एवढ्यावरच न थांबता भारतीय पेयांचा ह्यब्रँडꣳ निर्माण करणे, अशा सर्वच स्तरांवर सरकारने प्रयत्न केल्यास त्यातून अर्थव्यवस्था बळकट होण्यासह ह्यकथित एनर्जी ड्रिंकꣳमुळे उद्भवणारे आरोग्याचे प्रश्नही मिटतील आणि भावी पिढी सुरक्षित राहील.

प्रश्न तारतम्याचा

गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा उत्सव असला तरी बदलत्या काळात पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही त्याच्याशी जोडली गेली आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरील वाद, न्यायालयीन सुनावणी आणि पर्यावरणपूरक पर्यायांबाबत सुरू असलेली चर्चा यामुळे उत्सवाचे स्वरूप पुन्हा नव्याने तपासण्याची वेळ आली आहे.

ह्यगणपती बाप्पा मोरया!ꣳ हा केवळ जयघोष नाही; तो कोट्यवधी मनांमधील श्रद्धेचा, संस्कृतीचा स्वर आहे. वर्षाऋतूच्या उत्तरार्धात जेव्हा सृष्टी हिरवा शालू नेसून सजलेली असते, डोंगर-दऱ्या नव्या पालवीने बहरलेल्या असतात, नद्या दुथडी भरून वाहत असतात आणि धरती नवजीवनाने नटलेली असते, तेव्हाच विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन होते. गणेशोत्सव म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर, रोषणाई किंवा देखाव्यांची स्पर्धा नव्हे; तो कौटुंबिक जिव्हाळा, सामाजिक ऐक्य, लोकसहभाग आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याचा मंगल सोहळा आहे. मुळात भारतीय संस्कृती ही मातीशी जोडलेली संस्कृती आहे. मातीतून साकारलेल्या गणरायाची प्राणप्रतिष्ठा करून त्याला पुन्हा पंचमहाभुतांत विलीन करणे, हा आपल्या परंपरेने दिलेला निसर्ग संवर्धनाचा शाश्वत संदेश आहे. मात्र काळाच्या ओघात या परंपरेवर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगांचे आवरण चढले आणि श्रद्धेच्या या उत्सवासमोर पर्यावरणाचे नवे प्रश्न उभे राहिले. याच प्रश्नाने पुन्हा एकदा न्यायालयाचे दार ठोठावले आहे. काही ठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पूर्ण मोकळीक मिळाल्याचा दावा केला जात आहे, तर काहीजण संपूर्ण बंदी निश्चित झाल्याप्रमाणे वातावरण निर्माण करत आहेत. प्रत्यक्षात या दोन्ही दाव्यांना कोणताही न्यायालयीन आधार नाही. उच्च न्यायालयाने अद्याप अंतिम निर्णय दिलेला नसून, राज्य सरकारने सादर केलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालावर सुनावणी सुरू आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेली स्थिती ही अंतिम निकाल नसून न्यायप्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने मांडलेली भूमिका विशेष लक्षवेधी आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की हा विषय केवळ श्रद्धेचा किंवा केवळ पर्यावरणाचा म्हणून पाहता येणार नाही. एका बाजूला नद्या, तलाव आणि समुद्रातील वाढते प्रदूषण आहे; दुसऱ्या बाजूला हजारो मूर्तिकार, कारागीर, रंगकाम करणारे कामगार, त्यांच्यावर अवलंबून असलेली कुटुंबे आहेत. पर्यावरणाचे संरक्षण करताना त्यांच्या रोजगाराचे काय होणार, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. म्हणूनच कोणतीही घाईघाईने भूमिका न घेता वैज्ञानिक माहिती, तज्ज्ञांचे मत आणि शासनाचा आराखडा समोर आल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी सावध भूमिका न्यायालयाने घेतली आहे. राज्य सरकारने न्यायालयात सादर केलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालाने या चर्चेला नवी दिशा दिली आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे विसर्जनानंतर रासायनिक प्रक्रियेद्वारे पुनर्वापर करण्याची कल्पना प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे समितीने नमूद केले आहे. अशी प्रक्रिया खर्चिक असून तिच्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणेही सोपे नाही. त्यामुळे राज्यभर तातडीने अशी व्यवस्था उभारण्याऐवजी निवडक शहरांमध्ये प्रायोगिक प्रकल्प राबविण्याची शिफारस समितीने केली आहे. त्या प्रयोगांचे निष्कर्ष, पर्यावरणीय परिणाम आणि आर्थिक व्यवहार्यता तपासल्यानंतर पुढील धोरण निश्चित करावे, असे समितीचे मत आहे. या शिफारशीचा अर्थ प्लास्टर ऑफ पॅरिसला कायमस्वरूपी मान्यता असा होत नाही; तसेच तत्काळ संपूर्ण बंदीच हाच एकमेव मार्ग आहे, असेही समितीने म्हटलेले नाही. विज्ञान, पर्यावरण आणि व्यवहार्यता यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न या अहवालातून दिसून येतो. प्लास्टर ऑफ पॅरिस पाण्यात सहज विरघळत नाही, त्यावरील रासायनिक रंगांमुळे जलप्रदूषण वाढते, जलचरांवर परिणाम होतो आणि विसर्जनानंतर मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण होतो, ही वस्तुस्थिती अनेक वर्षांपासून अभ्यासातून पुढे आली आहे. याच संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आपल्या मातीतून घडविलेल्या गणेशमूर्तींची स्थापना करण्याचे आणि ह्यव्होकल फॉर लोकलꣳचा स्वीकार करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनामागे केवळ पर्यावरणाचा विचार नव्हता. स्थानिक मूर्तिकारांना प्रोत्साहन, भारतीय मातीशी असलेले सांस्कृतिक नाते दृढ करणे आणि पर्यावरणपूरक परंपरांचा पुनर्विचार करणे, हा त्यामागील व्यापक संदेश होता. तथापि, केवळ आवाहनांनी परिवर्तन घडत नाही. शासनाने त्यासाठी सक्षम पायाभूत व्यवस्था उभारणे अत्यावश्यक आहे. शाडूची माती सहज उपलब्ध होणे, तिच्या किमती नियंत्रणात ठेवणे, मूर्तिकारांना प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य देणे, पर्यावरणपूरक रंगांचा वापर वाढविणे, या सर्व बाबींची अंमलबजावणी झाल्याशिवाय पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही संकल्पना व्यापक प्रमाणात यशस्वी होणार नाही. अन्यथा बदलाची संपूर्ण जबाबदारी केवळ नागरिकांवर टाकणे अन्यायकारक ठरेल. समाजानेही आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. गणरायाचे मोठेपण मूर्तीच्या आकारात नसते; ते भक्तीच्या विशालतेत असते. उत्सवाची शोभा ध्वनिप्रदूषणात, कृत्रिमतेत किंवा भपक्यात नसून संस्कार, संयम आणि निसर्गाशी असलेल्या सुसंवादात आहे. आता सर्वांचे लक्ष उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे लागले आहे. हा निर्णय केवळ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवानगी द्यायची की नाही, एवढ्यापुरता मर्यादित राहणार नाही. तो महाराष्ट्राच्या पर्यावरणीय धोरणाची, गणेशोत्सवाच्या भविष्यातील दिशेची आणि हजारो मूर्तिकारांच्या उद्याच्या आयुष्याची वाट ठरविणारा असेल. त्यामुळे न्यायालयाने पर्यावरण संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देतानाच राज्य सरकारकडून मूर्तिकारांच्या पुनर्वसनाचा, पर्यावरणपूरक पर्यायांचा आणि टप्प्याटप्प्याने होणाऱ्या संक्रमणाचा ठोस आराखडा निश्चित करून घेणे, ही काळाची गरज आहे. कारण शेवटी प्रश्न प्लास्टर ऑफ पॅरिसचा किंवा शाडूच्या मातीचा नाही. प्रश्न आहे आपल्या संस्कृतीच्या परिपक्वतेचा. परंपरा टिकवायची असेल तर निसर्ग वाचवावाच लागेल. श्रद्धा जपायची असेल तर पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारावीच लागेल. गणराय हा विघ्नहर्ता आहे; त्याच्या आगमनाने निसर्गाला विघ्न निर्माण होणार नाही, अशी व्यवस्था निर्माण करणे हीच खरी गणेशभक्ती ठरेल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

निविदा (ड) सुचना क्र. ०४ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग, ठाणे यांचेकडून मध्यवर्ती कार्यालय, मजीप्रा सिडको भवन कार्यालयात झेरॉक्स मशीन पुरविणे व झेरॉक्स काम करणेबाबतच्या निविदा 'ड' नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किंमत रु. ५,८२,६५०/- इतकी आहे.

सदर कामासंबंधीचा सविस्तर तपशिल दि. ३१/०७/२०२६ रोजी उपलब्ध करण्यात येईल.

सही /-
कार्यकारी अभियंता (प्र.)
मजीप्रा विभाग, ठाणे.

क्र. जिमाका/ठाणे/जाहि/2026-27/70

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२१ जुलै २०२६ ते २७ जुलै २०२६

दोन लग्न केलेल्या प्रेयसीची हत्या, चौथ्या तरुणाच्या संपर्कात असल्याचा प्रियकराचा दावा

लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका 32 वर्षीय महिलेची तिच्या प्रियकराने कथितरित्या चाकूने वार करून हत्या केली. यानंतर आरोपी स्वतःहून पोलीस ठाण्यात जाऊन हत्येची कबुली दिली. ही धक्कादायक घटना हरियाणातील हिसार येथील आहे.

मुंबई। नात्यांना काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या पाच वर्षांपासून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका 32 वर्षीय महिलेची तिच्याच प्रियकराने चाकूने वार करून निर्घृण हत्या केली. धक्कादायक बाब म्हणजे, या रक्ताळलेल्या थरारानंतर आरोपी थेट पोलीस चौकीत पोहोचला आणि म्हणाला, ह्यमी पूजाचा खून केला आहे, ती दुसऱ्या एका तरुणाच्या संपर्कात होती.ह्ण आरोपीचे हे शब्द ऐकून पोलीसही चक्रावून गेले. पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेत घटनास्थळ गाठले, तिथे खोलीमध्ये पूजा नावाच्या महिलेचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. पोलिसांनी तत्काळ गुन्हा घडलेले ठिकाण सील करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. हरियाणाच्या हिसार जिल्ह्यातील ही घटना आहे. दोन विवाह आणि तीन मुली प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मृत पूजाचे यापूर्वी दोन विवाह झाले होते आणि तिला तीन मुलं आहेत. दुसरे लग्न मोडल्यानंतर ती गेल्या पाच वर्षांपासून गौरव नावाच्या तरुणासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (2 जून) पहाटे तीनच्या सुमारास पूजा आणि गौरव यांच्यात कोणत्यातरी कारणावरून जोरदार वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, गौरवने



रागाच्या भरात चाकू काढून पूजावर सपासप वार केले. तिच्या गळ्यावर, पोटावर आणि पाठीवर अनेक गंभीर जखमा झाल्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. यानंतर सकाळी 10 च्या सुमारास ही घटना उघडकीस आली, जेव्हा आरोपीने स्वतः पोलिसांकडे जाऊन गुन्ह्याची कबुली दिली.

चौथ्या तरुणाशी संपर्क अन हत्या

पोलीस चौकशीदरम्यान आरोपी गौरवने दावा केला आहे की, पूजा गेल्या पाच-सहा महिन्यांपासून आणखी एका चौथ्या तरुणाच्या संपर्कात होती. दोन लग्नं झाल्यानंतर ती आपल्यासोबत राहत होती आणि आता ती दुसऱ्या कोणाशीतरी संबंध ठेवून होती, याच संशयातून आणि रागातून तिची हत्या केल्याचे त्याने सांगितले. मात्र, पोलिसांनी आरोपीच्या या दाव्यांना अद्याप अधिकृत दुजोरा दिलेला नाही. पोलीस सर्व बाजूने तपास करत असून फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. तसेच हत्येसाठी वापरलेला चाकूदेखील पोलिसांनी जप्त केला असून आरोपीची कसून चौकशी सुरू आहे.

पूजाच्या आईचा धक्कादायक दावा दुसरीकडे, मृत महिलेची आई संगीता यांनी आरोपी गौरववर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. गौरव आपल्या मुलीकडून चुकीची कामे करून घ्यायचा आणि तो बेकायदेशीर धंद्यांमध्ये सामील होता, असा आरोप त्यांनी केला आहे. बेकायदेशीर कृत्यांतूनच त्याने शिवनगर भागात घर आणि प्लॉट खरेदी केल्याचेही त्यांनी सांगितले. मूळचा ई-रिक्षा चालक असलेला गौरव काही महिन्यांपूर्वीच शिव कॉलनीत भाड्याच्या घरात राहण्यास आला होता, तिथेच त्याची पूजाशी ओळख झाली होती. सध्या आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून, शवविच्छेदन अहवाल आणि फॉरेन्सिक पुराव्यांच्या आधारे पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

पुन्हा एकदा बेस्टचा अपघात

अंधेरीत रिक्षांना धडक... दोन महिन्यातील तिसरी घटना



मुंबई। अंधेरी पश्चिम येथे भीषण अपघात घडला आहे. बेस्ट बसने अनेक वाहनांना धडक दिली आहे. जवळपास 14 गाड्या एकमेकांवर आदळल्या आहेत. अपघातात दोन ते तीन जण जखमी झाल्याची माहिती समोर येतेय. जखमींना कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुंबईतील अंधेरी सबवे रोड परिसरात बेस्ट बस क्रमांक 242 चा भीषण अपघात झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, भरधाव वेगात असलेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यावरील तब्बल दहा वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते आणि वाहतुकीवरही परिणाम झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमी झालेल्या तीन जणांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातग्रस्त वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. चालकाचे नियंत्रण नेमके कशामुळे सुटले, बसमध्ये तांत्रिक बिघाड होता का, की अन्य कोणते कारण होते, याचा तपास केला जात आहे.

दोन महिन्यात दोन बेस्ट बसचे अपघात

▶ जून महिन्यात दादरमधील प्लाझा सिनेमा आणि वीर कोतवाल गार्डनजवळ बेस्ट बसने अनेक वाहनांना आणि पादचाऱ्यांना धडक दिली. यामध्ये एका डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला होता. तर, यामध्ये 6 जण जखमी झाले होते. चालकाने ब्रेक फेल झाल्याचा दावा केल्या होता. पण, मुंबईच्या आरटीओ अहवालानुसार, तपासणीत ब्रेकिंग सिस्टममध्ये कोणताही दोष आढळला नाही. चालकाने घाबरून ब्रेकऐवजी कनवर्टर/ॲक्सिलेटर दाबल्याने ही मानवी चूक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

▶ 8 जुलै रोजीच भांडुपमध्ये एका इलेक्ट्रिक बेस्ट बसने मागे घेताना एका पादचाऱ्याला धडक दिली होती. तसेच, यावेळी 4 वाहनांना धडक दिली. बस चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला असून या भागातील धोकादायक वळणामुळे बस चालवताना अडचणी येत असल्याच्या तक्रारी असल्याचे यावेळी समोर आले होते.

विधवा सुनेने केली सासऱ्याची हत्या... बलात्काराचा दावा

मुंबई। एका 28 वर्षीय विधवा महिलेने तिच्या 58 वर्षीय सासऱ्याची हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (1 जुलै) पहाटे घडली. सासऱ्याने घरात एकटी पाहून तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला असता, स्वतःच्या संरक्षणासाठी आपण हे पाऊल उचलल्याचा दावा या महिलेने केला आहे. पेरुमल असे मृत व्यक्तीचे नाव असून तो मासे विक्रीचा व्यवसाय करायचा. तीन महिन्यांपूर्वीच आजारपणामुळे पतीचे निधन झाल्यानंतर ही महिला तिची आठ वर्षांची मुलगी, सासू आणि सासऱ्यासोबत राहत होती. चेन्नईतील पल्लवरम परिसरातील ही घटना आहे.



घरात सून एकटीच असताना...

प्राथमिक तपासातून मिळालेल्या माहितीनुसार, मृत पेरुमल हा गेल्या काही काळापासून सुनेवर अयोग्य टिप्पण्या करून आणि चुकीच्या पद्धतीने स्पर्श करून तिचा छळ करत होता. या छळाला कंटाळून महिलेने तिच्या सासूला या प्रकाराबाबत सांगितले होते, यामुळे सासू-सासऱ्यांमध्ये वाद होत होते. अशाच एका वादामुळे सासू काही दिवसांपूर्वीच नातेवाईकांकडे निघून गेली होती. त्यामुळे घरात महिला आणि तिची मुलगी पेरुमलसोबत एकट्याच होत्या.

पहाटेच खोलीत शिरला

बुधवारी पहाटेच्या सुमारास पेरुमलने सुनेच्या खोलीत जबरदस्तीने प्रवेश केला, जिथे ती तिच्या मुलीसह झोपली होती. तिथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत महिलेने त्याला जमिनीवर ढकलले आणि घरात असलेले कोयता उचलून त्याचा गळा चिरला, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

स्वतःच शेजाऱ्यांना सांगितली घटना

या घटनेनंतर ती महिला हातात कोयता घेऊन घराबाहेर आली आणि तिने शेजाऱ्यांना घडलेला सगळा प्रकार सांगितला. सासऱ्याने बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्यामुळेच आपण त्याला मारल्याचे तिने कबूल केले. तिने स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन होण्याची इच्छा व्यक्त के ली आणि शेजाऱ्यांना तिच्या मुलीची काळजी घेण्याची विनंती केली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत महिलेला ताब्यात घेतले असून हत्येसाठी वापरलेले शस्त्र जप्त केले आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. वविशम /कर/८०६/२०२६-२७

दिनांक - २१/०७/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	NL02/281/32	ASS/38881	शिवरात्री कनोजिया	संतोष लालजी कनोजिया
2	NL03/1100/3	ASS/32523	लल्लन बजरंग राम	दिलीपकुमार शिवप्रकाश विश्वकर्मा
3	NL02/153/53	ASS/40105	शेरबहादुर रामसमाज पाल	उषा पाल/संतलाल रामप्रसाद पाल
4	NL03/626/32	ASS/40104	गणेश देवजी धुमाळ	रश्मी गणेश आगरी
5	NL03/427/28	ASS/40102	अरुण सिताराम साखळे	शंकर लक्ष्मण गोविलकर
6	NL03/417/24	ASS/40101	पवनराज मच्छद्रन नाडार	कामराज कल्लार
7	NL02/621/46	ASS/40099	प्रणित जगन्नाथ धुरी	रजनी संतोष मांगडे
8	NL02/858/3	ASS/40100	सईद महमूद शेख/जावेद महमूद शेख	नाजरा बेगम नईमुद्दीन सिध्दिकी
9	NL02/747/25	ASS/38884	प्रेमलता स्वामीनाथ शर्मा	छगनलाल S/O हंसा राम
10	NL05/374/34	ASS/38883	बिना विनोद पडियार	अमित अनिरुध्द सिंग
11	NL07/487/51	ASS/37525	मनिषा जयेश ठक्कर	संदेश संदिप सुबरे
12	NL06/10/20	ASS/37527	चंद्रशेखर अनंत काळे	विशाखा चंद्रशेखर काळे
13	NL07/537/9	ASS/37531	रामजी गणेश गामी	महावीर प्रसाद विश्वचंद जोशी
14	NL04/344/9	ASS/37528	गंगाधर अ चव्हाण	राजकुमार मीना/ रोशनी देवी
15	NL04/399/59	ASS/37530	दिनेश गोपीनाथ गोसावी	जितेंद्र लिलाथर गोकाणी
16	NL07/495/37	ASS/37536	रामजी गणेश गामी	विजया संजय शिंदे/ संकेत संजय शिंदे
17	NL07/102/2	ASS/37523	चंदन हिरालाल गुप्ता/ धीरज हिरालाल गुप्ता	जितेंद्र शिवजनम शर्मा
18	NL07/420/64	ASS/37875	शलिनी शरद पेडेकर	गुजर नरेंद्रनाथ सुरेश
19	NL07/483/4	ASS/37524	राजेशकुमार राधेश्याम माली	मनोज राधेश्याम माली
20	NL02/775/4	ASS/37493	विनायक रा. दळवी	फरीदा फकी

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com